# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 11/05/2023

| अ. क्र | पो.स्टे. | गु.र.नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला तारीख वेळ | गुन्हा दाखल तारीख वेळ | फिर्यादीचे नाव व पत्ता | आरोपीचे नाव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अचलपुर | 125/ 24 कलम 354 ,323 504, 506 , भादवी | अचलपुर | 10/05/2024 चे 16/00 वा | 10/05/2024 चे 21/52 वा | महिला वय– 27 वर्ष, | 1.पुश्पंक अरुन मुगल , वय 25 वर्ष, रा विलायतपुरा अचलपुर, | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी व आरोपी एकमेकांचे नातेवाईक असुन यातील फिर्यादी ही वडील बहीन भावासह शेतात ट्रॅक्टरची नागरनी असल्याने हजर असतांना नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाला ट्रॅक्टर बंद कर माझे शेत आहे म्हटले वरुन फिर्यादी ही वडील भावासह आरोपीस समजविण्यास गेले असता आरोपीने फिर्यादीस खाली लोटले अंगावर पडुन छाती दाबुन तिचा विनयभंग केला व बहिनीला लाथा बुक्क्यांनी मारहान करुन शिवीगाळ केली पाहुन घेण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| 2 | अंजनगाव सुर्जी | 349/ 2024 कलम 363 भादवी | अंजनगाव सुर्जी | 05.5.24 चे 10.00 वा ते दि.06.05.24 चे 4.00 वा | 10.05.2024 चे 13.30 वा | महिला वय40वर्श | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घतावेळ व ठिकाणी यातील फि व फि चे कुंटुब हे रात्री झोप गेले असता सकाळी 04.00 वा. दरम्यान उठली असता फिची मुलगी हि दिसली नाही फि ला वाटले की, ती बाहेर बाथरूम करीता गेले असेल फि ने जास्त लक्ष दिले नाही परंतु तिला जावुन दोन तास झाले तरी ती घरी परत आली नाही म्हणुन फि त्याचे जवाई यांचे घरी जावुन मुलीची विचारपुस केली त्या ठिकाणी मिळुन आले नाही तिचे आज पावेतो आजुबाजुच्या परिसरात तसेच गावात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळुन आली नाही कोणी तरी अज्ञात व्यक्तीने फुस लावुन पळुन नेले असावे अशा फि चे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल तपासात घेतला. |
| 3 | चांदुर बाजार | 310/24 कलम 452 504 506 भादवी | मैनाबाई शाळे जवळ चांदुर बाजार 500 मीटर उत्तर | 10/05/24 चे 17/00 वा दरम्यान | 10/05/24 चे 20/26 वा | महिला वय 32 वर्श | विजय उर्फ जॅनी भवरे वय 17 वर्श रा राउतपुरा चांदुर बाजार | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी ही घरी एकटी हजर असतांना यातील आरोपी याने फिर्यादीच्या घरी पाणी पिण्याच्या बहाना करुन घरामध्ये अनाधिकुत प्रवेश केला व फिर्यादीने त्यास येथुन जा असे म्हटले असता त्याने फि स शिवीगाळ करुन नही जाता यहा से असे म्हणुन मारण्याची धमकी दिली वरुन गुन्हा नोंद |
| 4 | अंजनगाव सुर्जी | 350/24 कलम 392, 341 भादवी | खन्ना देशी दारु दुकाना समोरील मोकळया जागेत | 10,05,24 चे 1,30 वा दरम्यान | 10,05,2024 चे 22,34 वा | सैयद आरीफ सैयद साबीर वय 40 वर्श धंद चालक रा काकडा ता अचलपुर जि अमरावती ह,मु टाकरखेडा मोरे ता अंजनगाव सुर्जी जि अम | भों–या उर्फ अजहर खामजर खा वय 27 वर्श रा सलीम नगर सुर्जी | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी यातील फि चे मालकीचे टाटा क एम एच 04 एफ डी 2993 ही चारचाकी गाडी दुरुस्ती घेवुन आले असता वर नमुद घतावेळी फि ला आरोपीने रस्ता आडवुन फि चे कॉलर पकडली व म्हणाला की पैसे काढे तेव्हा फि ने म्हटले पैसे नाहीत असे म्हटले गुपचुप पैसे काढ नाहीतर तुला फॅक्चर होईपर्यत मारीन असे म्हणुन फि पॅन्टच्या खिशात हात घालुन बळजबरीने 2500रू काढुन घेतले व जिओ कंपनीचा मोबाईल किअं.3500रू तसेच फि चा मित्र नितीन भामतकर यांचे खिशात तुन 500 रू बडजबरीने काढुन घेतले तसेच एकुन कि 6500रू चा ''''न आमच्या खिशातुन बळजबरीने काढुन घेतले वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | ब्राम्हणवाडा थडी | 209/24 कलम 420, 406, 465, 466, 468, 470, 471 भादवी | तलाठी कार्यालय सोनोरी | 08/03/2016 ते दि . 03/10/2024 | 10/5/24 चे 21:01 वा | प्रकाश गणेशराव राउत वय 67 वर्ष रा नानोरी ता चांदूर बाजार | सोनु उर्फ निलेश विलासराव राउत वय 42 वर्ष रा.नानोरी ता.चांदुरबाजार ह.मु.न्यु.कॉनली दस्तुरनगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठीकानी यातील फिर्यादीचे नावाने असलेले शेत हे आरोपी याने शेतीचे खोटे वाटनी पत्र तयार करून व ते खरे आहे असे वापरून साक्षीदारांचे खोटया सहया करून स्वताचे नावाने करून घेवुन फिर्यादीची फसवणुक केली आहे.वरून फिर्यादीचे जबानी रिर्पोट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | मंगरूळ दस्तगीर | 205/24 कलम 324,323,504, 506 भादवी | मौजा वकनाथ शेत शिवार 15 की मी पुर्व | 10/05/24 चे 07/00 वा. | 10/05/24 चे 11/10 वा | अंबादास श्रावणजी ढगे वय 62 धंदा शेती रा.वकनाथ ता. धामणगाव रेल्वे | गोपाल कवडुजी रंदळे वय 61 शेती मजुरी जात माना रा.वकनाथ ता. धामणगाव रेल्वे | हकीकत अशा प्रकारे आहे कि,फिर्यादी व आरोपीचे शेत मौजा वकनाथ शेतशिवार मध्ये धु–या ला धुरा लागूण आहे.त्यांचे मध्ये धु–या च्या जागेवरूण बरेच दिवासा पासून वाद आहे.नमूद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी हा फिर्यादीचे शेताचं धु–यावर विटा रचत होता.म्हणून फिर्यादी याने आरोपीला म्हटले की,तु विटा तुझे धु–यावर रच असे म्हटले असता आरोपी त्याचे हातातील विट फिर्यादीचे डोक्यावर मारल्याने जख्म होवून रक्त निघाले.फिर्यादीचे मुला सुध्दा थापडा भुक्यांनी मारहाण करूण शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून व मेडी सर्टी वरूण सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 7 | अचलपुर | 124/2024 कलम 324 ,323, 504, 506 भादवि | खेल घुमट शेत शिवार अचलपुर | 10/05/2024 चे 16/00 वा | 10/05/24 चे 20/37 वा | पुष्पक अरून मुगल वय 25 वर्ष रा विलायतपुरा अचलपुर | 1,उकर्डाजी रामाजी मुगल वय 50, 2 महिला वय 27 , 3., महिला वय 25 सर्व रा विलायतपुरा अचलपुर | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी व आरोपी एकमेकांचे नातेवाईक असुन घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा शेतात नांगरनी करिता ट्रॅक्टर घेवुन आला तेव्हा फिर्यादी याने ट्रॅक्टर चालकास म्हटले की आमची शेताची वाटनी झाली आहे त्या प्रमाने नांगरनी कर तेव्हा आरोपी क्र 01 याने म्हटले की त्याचे काही एकु नको तु नांगरनी कर तेव्हा मी त्याला थांबवले असता आरोपी क 2 व 3 हयांनी माझी कॉलर पकडली तेव्हा आरोपी क 01 याने माझे वडिलांना पकडुन लाथा बुक्कयांनी मारहान केली मी माझे वडिलांना सोडविण्यास गेलो असता त्यांनी मला लाकडी काठीने माझे दोन्ही पायावर मारले व शिवीगाळ केली वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| 8 | धारणी | 310/24 कलम 324 504 भादवि | ग्राम मांडवा | 10/05/24 चे 07/00 वा | 10/5/24 चे 13/57 वा | महिला वय 40 वर्ष | किसन शिकारी काकडे वय 45 वर्ष रा मांडवा | हकीकत असा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि ही मागिल एक महिण्यापासुन तिचे पती सोबत भांडन झाल्याने ते तिचे वडिलाकडे राहत आहे व आज रोजी फि ही घरी हजर असता तिचे पती तिथे आले व म्हणाला की घरी चल तर फि ने नकार दिला असता या कारणावरुन नमुद आरोपीने फिस शिवीगाळ करूण तीचे उजव्या हातावर दाताने चावा घेतल्याने फि चे हाताचे रक्त निघाले व फि ही जख्मी झाल्याने फि चे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| 9 | चांदुर रेल्वे | 226/24 कलम 379, 34 भादवी | बस स्टॅड चांदुर रेल्वे दक्षिण 05 किमी | 10/5/24 चे 12/30ते 13/00 वा दरम्यान | 10/05/24 चे 15/36 वा | विजय दिपकराव पोहणकर वय 34 वर्ष धंदा एल आय सी एजेंट रा मुर्तीजापुर जि अकोला | 1.सैयद साजीद सैयद अली वय 32, 2.शेख अयुब शेख बाबर वय 42 रा दोन्ही हबिब नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे पत्नीसह बस पकडण्याकरीता जात असतांना त्यांचे खिशात असलेला जुना वापरता ओप्पो कंपनीचा मोबाईल कि अं 10,000 रु चा चोरी गेल्याचे त्यांचे लक्षात आले. अशा फी चे जबानी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| 10 | आसेगाव | 116 / 24 कलम 379 भादवी | ग्राम विरुळ पुर्णा | 09 / 05 / 24 चे 20 / 30 वा ते 21 / 30 वा दरम्यान | 10 / 05 / 24 चे 14 / 17 वा | संतोश किसनराव बोबडे वय 47 वर्श रा. विरुळ पुर्णा | दिनेश वाढीवा रा बोथी ता. भसदई जि. बैतुल मध्य प्रदेश | हकीकत अशी की फिर्यादी नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याच्या मो सा ने शेतात गेले मोसा ही रोडच्या बाजुने उभी केली शेतातुन चक्कर मारुन परत आल्यावर पाहणी केली असता त्यांना मो सा दिसुन आली नाही त्यांनी आजु बाजु ला शोध घेतला असता ती मिळुन आली नाही नंतर सदर मोसा बाबत विचारपुस केली असता सदर मो सा ही आरोपी नामे दिनश वाढीवा रा बोथी याने नेल्याचे समजले अश्या फि च्या जबानि रिपोर्ट वरुन नमुद आरोपी विरुध्द सदरचा गुन्हा दाखल केला |
| 11 | तिवसा | अप नं 238 / 24 कलम 379 भा द वी | गुरुदेव नगर ग्राम पंचायत चे बाजेला 08 किमी पुर्व | 09 / 05 / 24 चे 18 / 30 वा ते 19 / 00 वा दरम्यान | 10 / 05 / 24 चे 13 / 48 वा | प्रकाश महादेवराव डहाके वय 58 वर्ष धंदा शेती रा केकतपुर ता जि अमरावतर | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की फीर्यादी हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी बाजार घेण्याकरिता व थोडया वेळाने येवुन पाहिले असता त्याची हिरो होंडा कंपनीची काळया रंगाची स्प्लेंन्डर प्लस मो सा क एम एच 24 ए एम 5836 अं कि 20000 रूची मो सा काणी तरि अज्ञात इसमने चोरून नेली अशा फि च्या रि वरून गुन्हा नोंद |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | शिरखेड | 151 / 24 क्लम 454, 380 भादवी | ग्राम खोपडा पुर्नवसन प चीम 8 किमी | 10 / 05 / 2024 चे 10.15 वा ते 13.00 वा दरम्यान | 10 / 05 / 2024 चे 21.20 वा | 'शरद देविदासरावजी जामदे वय 50 वर्श धंदा मजुरी रा. खोपडा | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फीर्यादी हे लग्नाकरिता गेले होते व लग्नातुन परत आले तेव्हा घराचे समोरील दाराचे कुलुप तुटलेले दिसले फीर्यादीने घरात जावुन पाहले असता आलमारीचे लॉकर तुटलेले दिसले त्यामधील 5 ग्राम सोन्याची पोथ कि.अ. 25000 रूपये व रोख रक्कम 25000 रूपये असा एकुण 50,000 रूपये चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरून नेला आहे.फीर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 13 | येवदा | अप क 130 / 024 कलम 279, 337, 338, 304 अ भादवी | ग्राम सांगळुद ते दर्यापुर रोडवर लेंढी नाल्याजवळ | दि 10 / 05 / 024 चे 19 / 00 दरम्यान | दि 10 / 05 / 024 चे 22 / 13 वा | मनिष देवानंद गावंडे वय 19 वर्ष रा सांगळुद | अज्ञात वाहन चालक | हकिकत अशी की यातील जखमी नामे अजय जयदेव वर्धे रा पळसो बढे जि अकोला हा त्याचे मोटार सायकल क एम एच 30 बी एम 4127काळया रंगाची स्प्लेंडर प्लस या वाहनाने दर्यापुर ते सांगळुद येथे जात असता त्याचे मागुन येणारे अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजी पणाने वाहन चालवुन मो सा ला ठोस मारली डॉ यांनी मृत घोषीत केले अशा जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| 14 | बेनोडा | 114 / 24 कलम 279,338, 304 अ भांदवी | मानीकपुर फाटया जवळ 03 किमी पि चम | 02 / 05 / 24 चे 19.00 ते 19.30 दरम्यान | 10 / 05 / 24 चे 20.04 वा | अरूण देवरावजी झोड वय 65 वर्श धंदा शेती रा इसंबी ता वरूड | अज्ञात वाहन | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फि व त्याचा मित्र मोसा पॅशन प्लस क एम एच 27 झेड 8229 ने दादाजी धुनीवाले दरबार खडका येथे दर्शना करिता जात असतांना समोरून एक अज्ञात स्कॉरपिओ कारचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निश्काळजीपनाने चालवुन मोसा ला धडक दिल्याने अपघात झाला त्यामुळे फि गंभीर जखमी झाला व फि चा मित्र वसंतराव महादेवराव बरवट हा उपचारा दरम्यान मरण पावला वरून सदरचा गुन्हा नोंद |

पोलीस अधिक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता